CMYK

दैनिक धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित. ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २५९ वा ▶ शनिवार दि. १५ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

# ‘शासन आपल्या दारी’ कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नाशकात

## कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून येणार २५ हजार लाभार्थी

## भाजपासह शिवसेना, राष्ट्रवादीकडून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नियोजन

### उपमुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध मंत्रीगण

**नाशिक । प्रतिनिधी**

‘शासन आपल्या दारी’ जिल्हास्तरीय कार्यक्रम आज शनिवार १५ जुलै रोजी डोंगरे वसतिगृह मैदान येथे १०.३० होणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून २५ हजार लाभार्थी उपस्थित राहणार आहेत. तर यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाशकात येत आहेत. यासाठी पालकमंत्री दादाजी भुसे यांनीही काल या कार्यक्रमाच्या संदर्भात आढावा बैठक घेऊन कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. तर मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अन्य मंत्रीगण नाशकात या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत.

सर्व यंत्रणांनी लाभार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देवून कार्यक्रमातील आपली जबाबदारी योग्यरितीने पूर्ण करून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांनी सर्व संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात ‘शासन आपल्या दारी’ जिल्हास्तरीय कार्यक्रमाच्या नियोजनाची नोडल अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी भिमराज दराडे, नितीनकुमार मुंडावरे, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश मिसाळ, नाशिक महानगरपालिका अपर आयुक्त प्रदीप चौधरी, पोलिस उपायुक्त मोनिका राऊत यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष तर प्रत्येक तालुक्यातील तहसिलदार, गट विकास अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, फुड पॅकेट्स, स्वच्छतागृह, त्यांची आसन व्यवस्था याबाबत काटेकोर नियोजन करून कोणत्याही लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी. कार्यक्रम स्थळी विविध शासकीय योजनांची माहिती देणारे ४० स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे कौशल्य विकास विभागामार्फत कार्यक्रम स्थळी सकाळी १० वाजेपासून आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्यात साधारण ५० आस्थापनांच्या ४ हजार ५०० रिक्त जागांसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे सकाळी १० वाजेपासून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



### असे आहेत तालुकानिहाय येणारे लाभार्थी

**नाशिक शहर व नाशिक ग्रामीण येथून प्रत्येकी ५ हजार लाभार्थी १५० सिटी लिंक बसेसच्या माध्यमातून कार्यक्रमस्थळी येणार आहेत. तसेच निफाड येथून १ हजार ५०० लाभार्थी ३० एसटी बसेस, देवळा ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, पेठ ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, त्र्यंबकेश्वर दोन हजार लाभार्थी ४० एसटी बसेस, नांदगांव ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, दिंडोरी दोन हजार लाभार्थी ४० एसटी बसेस, सिन्नर १५०० लाभार्थी ३० एसटी बसेस, येवला ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, मालेगाव दोन हजार लाभार्थी ४० एसटी बसेस, इगतपुरी एक हजार ५०० लाभार्थी ३० एसटी बसेस, सुरगाणा ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, बागलाण ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, कळवण ५०० लाभार्थी १० एसटी बसेस, चांदवड एक हजार लाभार्थी २० एसटी बसेस यानुसार जिल्हाभरातून एकूण २५ हजार लाभार्थी ४५० बसेसच्या माध्यमातून कार्यक्रमस्थळी येणार आहेत. यावेळी सुरगाणा, पेठ, कळवण व दिंडोरी या चार तालुक्यातून येणाऱ्या बसेस श्रद्धा लॉन्स जवळ तर इतर तालुक्यातून येणाऱ्या बसेस ईदगाह मैदान येथे थांबविण्यात येणार आहेत.**







## आपत्ती आणि धडे

मुसळधार पाऊस असताना भूस्खलनाचा धोका लक्षात घेऊन महामार्गांवर आणि पर्यटनस्थळांकडे जाणार्या मार्गांवर यंत्रणांकडून सावधगिरीच्या सूचना दिल्या जातील, अशी व्यवस्था गरजेची आहे.

उत्तर भारताला पुराचा जोरदार फटका बसला. केरळमध्ये मुसळधार, उत्तर भारत जलमय आणि महाराष्ट्रासारखे राज्य पेरणीसाठी पुरेशा पावसाच्या प्रतीक्षेत, हे मान्सूनचे विषम चित्र. यंदा पाऊस लांबला. अर्थातच जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली. या महिन्यात आतापर्यंत झालेल्या पावसाने सरासरी भरुन काढली आहे. उत्तर भारतात आतापर्यंत नेहमीच्या तुलनेत तब्बल ५९ टक्के अधिक पाऊस झाला आहे. उत्तर भारतात निर्माण झालेल्या पूरस्थितीचा सर्वाधिक फटका हिमाचल प्रदेशास बसला आहे. पावसाच्या तडाख्याने राज्याचे तीन हजार कोटीहून अधिक नुकसान झाले. दरडी कोसळून आणि भूस्खलनामुळे होणार्या दुर्घटना हिमाचल आणि उत्तराखंडासाठी नवीन नाहीत. मात्र, त्यांचे प्रमाण वाढत चालल्याचे ठळकपणे दिसते. सिमल्यात भूस्खलन झाले. त्या दुर्घटनेसह राज्यातील बळींची संख्या २० च्या घरात आहे. शेकडो पर्यटक ठिकठिकाणी अडकले आहेत. केवळ सिमला जिल्ह्यात १२० पेक्षा अधिक रस्त्यांवरील वाहतूक बंद पडली आहे. हिमाचलचे अर्थकारण पर्यटनावर अवलंबून आहे. पूर, भूस्खलन आणि दरडी कोसळल्याने तेथील जनजीवन पूर्वपदावर येण्यास आणखी काही कालावधी लागणार आहे. या सर्वांचा फटका पर्यटनाला बसणार, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. पंजाबसारख्या राज्यात शेतीत पुराचे पाणी गेल्याने शेतकर्यांना फटका बसणार आहे.

महानगरांना धोक्याची घंटा

वेगवेगळ्या राज्यांमध्ये बचाव आणि मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या ३९ हून अधिक तुकड्या तैनात कराव्या लागल्या, यावरून पूरस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल. दिल्ली, पंजाब आणि हिमाचलमध्ये सर्वाधिक तुकड्या आहेत. मुसळधार पाऊस सलग झाल्यावर मुंबईची दैना होते. नियोजनाच्या दृष्टीने दिल्लीचे चित्र देखील वेगळे नाही. मात्र, चंडीगडसारख्या सुनियोजित महानगरालाही पुराचा फटका बसला. ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. दिल्लीतील पावसाने ४१ वर्षांतील विक्रम मोडला आहे. रस्ते पाण्याखाली गेल्याने तेथील स्थिती दारुण बनली. अतिमहत्त्वाच्या व्यक्ती राहात असलेल्या भागातील रस्ते पाण्याखाली गेले, हे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य नाही. ठराविक कालावधीसाठी पावसाचा अंदाज व्यक्त करणे शक्ये होते, ही वस्तुस्थिती. मात्र, याचा अर्थ सर्व दोष निसर्गाच्या लहरीपणावर लादून चालणार नाही. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास शेती आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन, प्रमाणापेक्षा अधिक पाऊस झाल्यास आपत्कालीन यंत्रणांची सज्जता, ही खंडप्राय देशाची गरज आहे. याचा अभाव कमीअधिक प्रमाणात दिसतो. आपत्ती आल्यावर 'एनडीआरएफ'च्या तुकड्या बोलाविणे हा नुकसानीची व्याप्ती कमी करण्याचा पर्याय असू शकतो; पण कायम या यंत्रणेवर विसंबून राहण्यातून नियोजनाच्या बाबतीतील अनागोंदी लपविण्याचा प्रयत्न होतो. दिल्ली हे त्या अव्यवस्थेचे उदाहरण. बेकायदा वस्त्या कायदेशीर करण्याची चढाओढ करणारे राजकीय पक्ष वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरी सुविधा वाढविणे, ही जबाबदारी समजत नाहीत. लोकसंख्येचा किती ताण एखादे महानगर सहन करु शकेल, याला मर्यादा असते. दिल्ली असो किंवा मुंबई, नवे लोंढे सामावून घेण्याची या महानगरांची ताकद केव्हाच संपली आहे. जोपर्यंत नैसर्गिक आपत्ती कोसळत नाही, तोपर्यंत त्याबद्दल चर्चा होत नाही. उत्तराखंडाप्रमाणे हिमाचलमध्येही पर्वतरांगांमध्ये बोगदे खोदून जलद वाहतुकीच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. या सुविधा कागदोपत्री सुयोग्य वाटल्या तरी निसर्गाचा श्वास कोंडून टाकणार्या आणि भयावह आपत्तींना निमंत्रण देणार्या आहेत. नियोजनात समतोल, हा गाभा असला पाहिजे. तोच हरवल्याने पाऊस अथवा अन्य आपत्तींच्या वेळी त्या - त्या ठिकाणच्या सामान्य नागरिकांची फरफट होते. पर्यटकांना खेचून घेण्यासाठी निसर्गावर घाला घालत सिमेंटच्या जंगलांची उभारणी आणि पर्यटकांकडून देखील निसर्ग जपण्यात हातभारापेक्षा प्रदूषण वाढविण्यास मदत, हे चित्र बदलण्याचे नाव घेत नाही! गंभीर दृष्टीकोनातून जोपर्यंत आपत्तींच्या शक्यतेकडे पाहिले जात नाही तोपर्यंत बचाव कार्य, मदतीच्या घोषणा हा परिपाठ सुरुच राहील.

# आधी शिवसेना, आता राष्ट्रवादी

एक वर्षाच्या काळात आधी शिवसेना आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठा भूकंप झाला आणि या दोन्ही पक्षांतील दिग्गज नेत्यांसह बहुसंख्य आमदार आणि खासदार हे भाजपसोबत आले. अगोदर एकनाथ शिंदे आणि आता अजितदादा पवार यांनी त्यांच्या पक्ष नेतृत्वाविरोधात रणशिंग फुंकले आणि दोन्ही पक्षांच्या प्रमुखांना रस्त्यावर यावे लागले. आपलाच पक्ष ओरिजिनल आहे, असा दावा करीत उद्धव ठाकरे आणि शरद पवार या दोन्ही नेत्यांवर धावाधाव करण्याची पाळी आली आहे.




सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीत शिवसेना आणि भाजप युती होती आणि त्या विरोधात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी आघाडी होती. शिवसेनेचे ५६ आमदार निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे ५४ आमदार विजयी झाले. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उठाव झाला आणि शिवसेनेचे ४० आमदार (आणखी १० अपक्ष आमदार) भाजपसोबत गेले. जून-जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असंतोषाच्या स्फोट झाला आणि पक्षाचे ४० आमदार भाजपसोबत गेले. या बंडानंतर उद्धव ठाकरेंच्या पक्षात १६, तर शरद पवारांच्या पक्षात १४ आमदार उरले आहेत. दोन तृतियांश आमदार बाहेर पडले, तर त्या फुटीला कायद्यानुसार मान्यता मिळते. त्यासाठी शिवसेनेतील बंडखोर आमदारांची संख्या ३९ आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोर आमदारांची संख्या ३६ असणे आवश्यक आहे. एकनाथ शिंदे यांनी आम्ही शिवसेनेतून बाहेर पडललो नाही, तर आम्ही शिवसेना म्हणूनच भाजपसोबत सरकारमध्ये सामील झालो आहोत, अशी भूमिका मांडली आहेच. तसेच अजित पवारांनीही आम्ही काही राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडलेलो नाही, राष्ट्रवादी काँग्रेस म्हणूनच आम्ही भाजप सरकारसोबत राज्यात सामील झालो आहोत, हे स्पष्ट केले आहे.

शिवसेना विधिमंडळ पक्षाने एकनाथ शिंदे यांची गट नेते म्हणून निवड केली आहे आणि राष्ट्रवादी काँग्रेसनेही विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून अजित पवार यांना निवडले आहे. दादा गटाने जयंत पाटील यांना हटवून सुनील तटकरे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. तसेच अजित पवार हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष निवडल्याचेही घोषित केले आहे. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्यबाण निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाकडून मिळवून फार मोठी लढाई जिंकली आहे. पक्षाचे विधिमंडळ व संसदेतील संख्याबळ दोन तृतियांशपेक्षा जास्त शिंदे गटाकडे आहे. शिवसेना हे नाव जरी आपल्याकडे ठेवण्यात शिंदे गट यशस्वी ठरला असला तरी पक्षाचे मुख्यालय असणारे मुंबईतील दादर येथील शिवसेना भवन हे आजही उद्धव ठाकरे यांच्याकडे आहे. त्यावर अद्याप शिंदे गटाने दावा केलेला नाही. शिंदे यांनी ठाणे येथे पक्षाचे स्वतंत्र मुख्यालय उभे केले आहे. मुंबईत मंत्रालयासमोर बाळासाहेब भवन पक्ष कार्यालय सुरू केले आहे. अजित पवारांना आपल्याबरोबर ३६ पेक्षा जास्त आमदार आहेत हे सिद्ध करून द्यावे लागणार आहे.

एकनाथ शिंदे व अजित पवार हे दोघेही ताकदवान मराठा नेते आहेत. शिंदे यांचा प्रभाव ठाणे-पालघर जिल्ह्यावर अधिक आहे. अजितदादांचा प्रभाव पुणे व पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांवर जास्त आहे. शिंदे यांच्या बंडानंतर उद्धव यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले, सरकारच कोसळले. अजितदादांच्या बंडानंतर शरद पवार बंडखोर पुन्हा निवडून येणार नाहीत, असे सांगत त्यांच्या मतदारसंघातच सभा घेत आहेत.

शिंदे यांच्या बंडाची कल्पना माध्यमांना शेवटपर्यंत आली नव्हती. गेल्या वर्षी झालेल्या राज्यसभा व विधान परिषद निवडणुकीत महाआघाडीच्या अधिकृत उमेदवारांचा पराभव झाला तरी सरकारच कोसळेल असे वाटले नव्हते. पण शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी सुरत मार्गे गुवाहटी व गोव्याला कूच केले तेव्हा ठाकरे यांच्या सरकारचे बहुमत गेल्याचे स्पष्ट झाले. अजितदादांच्या बंडाच्या सर्व हालचालींचे केंद्र मुंबईत होते. बंड मुंबईत झाले आणि तत्काळ उपमुख्यमंत्री आणि नऊ मंत्र्यांचा शपथविधीही झाला.

शिंदे यांच्या बंडाचे नाट्य योजनाबद्ध होते. पंचतारांकित हॉटेलमध्ये ५० आमदारांचा पाहुणचार पंधरा दिवस चालू होता. वातानुकूलित खोल्या, मोटारी, विमाने अशा सर्व सुविधा होत्या. अजितदादांवर निष्ठा असणारे आमदार मुंबईत मोकळेपणाने फिरत होते. राष्ट्रवादीचे अनेक बंडखोर आमदार हे आमदार निवासात या काळात मुक्कामाला होते. शिंदे यांच्या समर्थक आमदारांना उबाठा सेनेच्या पक्ष प्रमुखांनी व प्रवक्त्यांनी गद्दार म्हणून हिणवले. डुक्कर, मिंधे, अशी लाखोली वाहिली, शिंदे गट दिसेल तिथे, अगदी मंगल कार्यात व समारंभातही '५० खोके एकदम ओक्के' अशा घोषणा दिल्या. दुसरीकडे शरद पवार किंवा त्यांच्या निष्ठावंतांनी अशी कोणतीही हिन दर्जाची भाषा कोणा आमदाराच्या वा मंत्र्यांच्या विरोधात वापरली नाही. शिंदे व ठाकरे दोन्ही गटांना निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयात परस्परांच्या विरोधात दाद मागावी लागली. पण आपण बंडखोरांच्या विरोधात कायदेशीर संघर्ष करणार नाही, असे शरद पवारांनी जाहीर करून टाकले. बंडखोरांना राजकीय ताकदीने उत्तर देऊन अशी रणनिती शरद पवारांनी अवलंबिली आहे.

शिंदे यांनी भाजपसोबत सरकारमध्ये जाऊन २०१९च्या निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला जनतेने दिलेला कौलच आपण अमलात आणला असे सांगितले. अजितदादा व त्यांची टीम यांनी ज्यांच्याविरोधात निवडणूक लढवली त्यांच्याच सरकारमध्ये सामील झाली. भाजपसोबत जाण्यापूर्वी शिंदे गटाने जाहीर वाच्यता केली नाही. दुसरीकडे अजितदादा मात्र आपण शेवटच्या श्वास असेपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राहणार असे सांगत राहिले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोडणार नाही, असे काय प्रतिज्ञापत्र लिहू देऊ काय, असा उलटा प्रश्न त्यांनी पत्रकारांना विचारला होता. शिंदे हे ठाकरे सरकारमधून बाहेर पडले आणि स्वत: मुख्यमंत्री झाले. ज्यांच्या मदतीने त्यांनी ठाकरेंना सत्तेवरून हटविण्याचे धाडस केले, त्या देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले. ठाकरे सरकार कोसळल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस वर्षभर विरोधी बाकांवर होती. पण सत्तेशिवाय आपण फार काळ राहू शकत नाही, हे अजितदादांच्या निर्णयाने दाखवून दिले.

टीम शिंदे यांचे आजही टार्गेट उद्धव ठाकरे आहेत. टीम अजितदादांचे टार्गेट शरद पवार आहेत. महाआघाडीच्या काळात ठाकरे कोणाला भेटत नव्हते, मंत्रालयात जातच नव्हते, आता शिंदे, पवार व फडणवीस हे तिघेही नेते सतत गर्दीने वेढलेले दिसतात. तिघेही राज्यभर दौरे करतात. पण तिघेही नोकरशहा, पक्ष कार्यकर्ते व जनतेला वैयक्तिक पातळीवर किती उपलब्ध असतात? सत्तेवर असताना उद्धव यांनी आदित्य यांना कॅबिनेट मंत्री केले. वडिलांच्या सतत पाठीशी दिसायचे. शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत एकदम प्रकाशझोतात आले. पितापुत्रांभोवती गर्दी सदैव असली तरी अपॉइंटमेन्ट घेऊन स्वतंत्र भेट मिळणे मुश्कील झाले. पक्षाबाहेरील लोकांशी विशेषत: पत्रकारांशी वैयक्तिक व गटागटाने विविध विषयांवर चर्चा होते असे आता ऐकायलाही येत नाही. गर्दीतून व हारतुर्‍यांच्या ढिगार्‍यातून काहीही साध्य होत नाही, केवळ फोटो सेशनसाठी जास्त गर्दी असते हे त्यांनाही चांगले ठाऊक असावे.

सत्तेवर असताना पक्षाचे व सरकारचे महत्त्वाचे निर्णय पक्षप्रमुखांची चौकडी घेत होती, कौटुंबिक वर्चस्व वाढले. त्यातून उद्धव ठाकरे यांच्याविरोधात असंतोष वाढला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांना डावलून सुप्रिया यांना जास्त महत्त्व दिले जाऊ लागले, यावरून अजितदादा गटात धुसफूस वाढली. शिवसेनेत आदित्य यांचे वाढणारे प्रस्थ आणि राष्ट्रवादीत सुप्रिया यांना दिलेले महत्त्व यातूनच बंडाची बिजे पेरली गेली.

विशेष म्हणजे आपल्या पक्षाचे आमदार मोठ्या संख्येने आपल्याला सोडून भाजपसोबत जाणार हे उद्धव ठाकरे व शरद पवार यांना अगोदरपासून ठाऊक होते. शरद पवारांना पक्षाच्या आमदारांनी ठराव करून स्वाक्षर्‍यांचे पत्र दिले होते. उद्धव ठाकरे यांनाही पक्षाचे आमदार मोठ्या संख्येने भाजपसोबत जाणार हे अनेकांनी भेटून सांगितले होते. पण पक्षात उभी फूट पडताना दोघेही नेते आपल्या आमदारांना रोखू शकले नाहीत. भाजपच्या रणनितीपुढे ठाकरे व पवार हतबल झाल्याचे दिसले.

**- डॉ.सुकृत खांडेकर**

# विमा पॉलिसीचा अर्थ आणि 'अर्थ'कारण


'वेळ कोणावर सांगून येत नाही', 'पैशाचे सोंग आणता येत नाही', 'वेळीच आर्थिक गुंतवणूक आणि सुरक्षितता यांचे नियोजन करा' असे संवाद घराघरात अगदी नित्याचे आहेत. १९९१ नंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर मानवी जीवन अनेक पातळींवर आमूलाग्र बदलले आणि त्याबरोबरच जीवनाची असुरक्षिततापण अपरिहार्यपणे आपल्या आयुष्यात डोकावली. त्यामुळेच जीवन सुरक्षा विमा उतरवणे काळाची गरज होऊन बसली. आता आयुर्विमा, कार विमा, अपघात विमा उतरवणे या अत्यावश्यक सेवा आपण सगळेच वापरतो. पण विमा घेताना सजग ग्राहक म्हणून आपण त्याची सखोल माहिती घ्यायला हवी आणि का? हेच आपण खालील उदाहरणातून समजून घेणार आहोत.

ही घटना रोहतक येथील आहे. त्याचे झाले असे की, १८ नोव्हेंबर २००९ रोजी रोहतक येथील पवन कुमार यांनी १५ लाख रुपयांची विमा पॉलिसी खरेदी केली होती. तथापि, ३० नोव्हेंबर २००९ रोजी काही समाजकंटकांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यात झालेल्या जखमांमुळे त्यांचा मृत्यू झाला. सोनेपत पोलिसांनी त्याच दिवशी या प्रकरणी प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवला. त्यातील मुख्य खोच अशी होती की, पवन कुमार यांनी अनेक विमा पॉलिसी घेतल्या होत्या. त्यातील एक पॉलिसी आदल्या दिवशीच म्हणजे १७ नोव्हेंबर २००९ ची देखील होती. जेव्हा त्यांचा भाऊ जगजित सिंग यांनी एलआयसीकडे दावा दाखल केला, तेव्हा तो ३१ मार्च २०१२ रोजी फेटाळण्यात आला, कारण पवन कुमार यांनी १८ नोव्हेंबर रोजी पॉलीसीमध्ये १७ नोव्हेंबर २००९ रोजी घेतलेल्या पूर्वीच्या पॉलिसीचे तपशील उघड केले नव्हते, जे एलआयसीच्या नियम क्रमांक ९ नुसार हे तपशील उघड करणे आवश्यक होते. एलआयसी (ङखउ)ने विमा रक्कम देण्यास नकार दिल्यामुळे, जगजित सिंग यांनी झज्जर जिल्हा ग्राहक निवारण आयोगासमोर खटला दाखल केला. ३० ऑगस्ट २०१६ रोजी आदेशात, जिल्हा आयोगाने मयत पवन कुमार यांच्या बाजूने निर्णय देत एलआयसीला विम्याची रक्कम देण्यास सांगितले. हा निर्णय मान्य नसल्यामुळे एलआयसीने हरियाणा राज्य ग्राहक निवारण आयोगासमोर अपील दाखल केले. ५ जुलै २०१७ रोजीच्या आदेशात, राज्य आयोगाने जिल्हा आयोगाने दिलेला आदेश कायम केला. नाराज होऊन, ङखउ ने नंतर राष्ट्रीय ग्राहक निवारण आयोगाकडे (छउऊठउ) अपील केले आणि असा दावा केला की, जिल्हा आणि राज्य आयोगाने काही मूलभूत तथ्य समजून घेण्यात गल्लत केली आहे. त्यामुळे वरील आदेश तांत्रिक सबब देऊन चुकीच्या अनुमानावर आधारित आहे. तसेच हा कायद्यानुसार योग्य दृष्टिकोन नाही. निकालांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याचे पालन करण्यात वरील आयोग अयशस्वी ठरला आहे कारण असे मानले जाते की, विम्याच्या कराराच्या मुळाशी जाणारी आणि त्यात समाविष्ट असलेल्या जोखमीवर परिणाम करणारी कोणतीही वस्तुस्थिती विमाधारकाने लपवून ठेवू नये. विमाधारकाने १७ नोव्हेंबर २००९ रोजी रु. १५ लाखांत घेतलेली पूर्वीची पॉलिसी लपवून ठेवली होती आणि त्याचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाख दाखवले आहे, तर सर्व पॉलिसींसाठी प्रीमियम रु.२,३०,४७६ इतका येतो. विमा कंपनीने असा युक्तिवाद केला की, सर्व पॉलिसींचा खुलासा केला असता तर विम्याची एकूण रक्कम रु. ३५ लाखांच्या पुढे गेली असती, ज्यामुळे अंडरराइटरला विशेष वैद्यकीय अहवाल जसे की ऋइड, लिपिडोग्राम, क्ल१-उ, आणि एलिसा चाचण्यांचे रिपोर्ट मागवावे लागतील आणि त्यानुसार निर्णय घ्यावा लागेल. यावर एनसीडीआरसीने (छउऊठउ) आदेश देताना असे नमूद केले की, १७ आणि १८ नोव्हेंबर २००९ ह्या दोन्ही पॉलिसी एलआयसीच्या एकाच शाखा कार्यालयाने आणि एलआयसीच्या अधिकार्‍यांनीच जारी केल्या होत्या. त्यामुळे एलआयसीला पॉलिसीचे ज्ञान होते आणि जरी न-प्रकटीकरण गृहीत धरले तरी ते सध्याच्या प्रकरणात लागू केले जाऊ शकत नाही. एलआयसीने पॉलिसी फॉर्ममध्ये पूर्वीच्या पॉलिसीचा खुलासा न करणे असा युक्तिवाद केला असला तरी ते मान्य करता येणार नाही. कारण एलआयसीला त्याबद्दल आधीच माहिती होती. जरी दोन पॉलिसीमधील अंतर एकाच दिवसाचे आहे. त्यामुळे, मृत व्यक्तीने कोणतीही वस्तुस्थिती जाणूनबुजून लपवून ठेवली असे मानता येणार नाही.

एनसीडीआरसीने असे नमूद केले की, मृत विमाधारकाने तथ्य लपवून फसवणूक किंवा चूक केली असे म्हणता येणार नाही. पुढे एनसीडीआरसीने राज्य आयोगाचा आदेश योग्य आहे त्यामुळे तो निर्णय कायम ठेवत आणि कायद्याला धरून असल्याचे निरीक्षण नोंदवले. एनसीडीआरसीने भारतीय आयुर्विमा महामंडळाला (ङखउ) मृत व्यक्तीच्या भावाला जगजीत सिंग ह्यांना विम्याचे १५ लाख रुपये ९ % व्याजाने दोन महिन्यात देण्याचे निर्देशित केले. शिवाय १५,००० रुपये खर्चापोटी जगजीत सिंग ह्यांना देण्यात यावे असाही आदेश देण्यात आला. तेव्हा चतुर ग्राहक म्हणून विमा काढताना कंपनीचा त्या संदर्भातील करार काळजीपूर्वक अर्थ समजून वाचणे अत्यंत आवश्यक असते तरच खर्‍या अर्थाने सुरक्षाकवच लाभले असे म्हणता येईल, नाहीतर महाभारतातील कर्णाप्रमाणे विमा कंपन्या ही कवचकुंडले कधीही काढून घेऊ शकतील.

**- नेहा जोशी : मुंबई ग्राहक पंचायत**

## शब्दकोडे-१२०



आडवे शब्द

१. पूर्ण बंदोबस्त ४. पुष्कळ ७. नम्रतेने मान खाली घालणे ११. एक पालेभाजी व खाद्य तेल १३. उष्ण, कढत १५. गंध १६. ओरखडा १८. डाळीचे कालवण २०. सोने २२. खोदण्याचे काम २४. सीतापती २५. सोन्याचा कस २६. बागवान २७. सोन्याची कांब २९. पहिला ऋतू ३१. चित्रपटाचा हिरो ३२. मर्कट ३४. आराम --- है! ३५. कठीण (प्रसंग) ३६. भीती ३८. हे मीठ देखील अळणी असते ४०. छोटा लहान ४२. सरसकट ४६. नाश, नेस्तनाबूत ४७. मातापिता ५०. पाण्यातील फूल ५२. गाव, शहर ५३. मिजास, डौल ५५. एकाग्र नजर ५६. जास्तीत जास्त व कमीत कमी ६०. वय ६१. रविवासर ६२. शर्त, पण ६४. मंत्रीमंडळ ६६. देवाणघेवाण ६८. मोठ्या पानांची एक पालेभाजी ७०. म ीठाची चव ७१. च्यासह, च्या बरोबर ७३. बारीक दगड ७४. श्रीरामाचे स्तोत्र ७७. हूल देणे म्हणजे अशी हाळी ८१. अंजन ८२. कारस्थानी ८३. नवरदेव ८४. गार, थंड ८५. अरण्य

उभे शब्द

१. किंचित कडू २. परशुरामाची भूमी ३. टिंगल ४. खराब ५. तपास, शोध ६. स्पष्ट, सडेतोड ८. तेव्हा (ग्रा.) ९. चर्चा १०. केर १२. कोवळी फांदी १४. अंत:करण १७. नमस्काराची हाळी १९. म ंडणी करणारा २१. चिवचिवाट २३. नूतन २६. मर्कट, कपि २८. डोंगरी किल्ला, डोंगर ३०. अनुमती ३३. संकटाची छाया ३४. दिलेली खात्री ३४अ. कडक, खरखरीत ३५. बाळाची गाडी नाव वडिलांचे! ३७. जीभ ३८. श्वासाचा अवयव ३९. महाराणा प्रताप यांच्या घोड्याचे नाव ४१. अक्षराचा उच्चार बदलणारी चिन्हे ४३. वटवट, त्रास ४४. फक्त, केवळ ४५. दुधाच्या वड्या ४७. जळजळीत, अत्यंत तीव्र ४८. जन्म ४९. पर्वत ५१. दहावी रास ५४. युद्ध ५६. व्यायाम ५७. ठोक! हाण! ५८. गडकरी ५९. अफूचे बी ६२. अभिनेता ६३. हजार किलो ६५. भांड्याला पडलेला खड्डा ६६. कुस्तीची जागा ६७. नृत्यकलेची जागा ६९. लक्ष्मीचे एक नाव ७२. अखेर, शेवट ७३. दर्यावर्दी ७५. मळलेला ७६. धुणे (संस्कृत) ७८. खेडे ७९. अजगर ८०. रेष ८१. आजच्या आधीचा दिवस

## शब्दकोडे ११९ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.ढाल तलवार ४.नकलाकार ७.चाक ९.पेशा १०.सासर १२.रमा १३.गडगडाट १६.रुबाबदार १८.वाटचाल १९.जर २१.जड २२.खेळ २३.पोवाडा २५.तास २७.बळकट ३०.ओ ३१.टकटक ३२.रगड ३३.तारवटणे ३६.गीताई ३९.टक ४०.फसगत ४२.तर ४३.वातहारक ४५.माळ ४७.कानस ४९.काळ ५०.तडकाफडकी ५२.सामनावीर ५३.कनात ५४.आब ५५.अवयव ५६.पडसाद ५८.विडा उचलणे ६१.यातना ६३.वारा ६४.सरदार ६६.रुकार ६८.मालक ७०.नवलकोल ७४.रद्दड ७६.वर्ण ७७.तार ७८.कलाकार ७९.बाधणे

**उभे उत्तर**

१.ढालगज २.तरंग ३.वाईट ४.नशाबाज ५.कासार ६.रस ७.चारचाकी ८.कमाल ९.पेरु ११.रवाळ १४.डरपोक १५.डाकोडाक १७.बडबडगीत २०.माता २२.खेटर २४.वाटण २६.सरबत २८.कताई २९.पोट ३१.टवटवीत ३४.वसंत ३५.डोस ३७.तारकानाथ ३८.नकळत ४०.फळफळावळ ४१.गळकी ४३.वासर ४४.रकाना ४५.माका ४६.कसाबसा ४८.नवी ५१.डरावडराव ५३.कवच ५४.आड ५६.पदर ५७.दया ५८.विनाकरण ५९.उभा ६०.लवलवणे ६२.तरु ६३.वानर ६४.सल ६५.दादला ६७.रद्द ६९.कर्ण ७१.लता ७२.कोर ७३.सूर ७५.डबा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**अ‍ॅड. एम. सी. बेडसे.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. ज्युडी, मॅजि. सो. वर्ग- १ यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज नं. ३६८/२०२३**

श्री. संजय प्रतापसिंग पटवाडा, उ.व.-४४, धंदा- शेती,
रा.मैंदाणे, पो.बोदगाव, ता.साक्री जि.धुळे .....**अर्जदार**
**विरुध्द**
निबंधक जन्म-मृत्यु,
तथा
म. ग्रामविकास अधिकारी,
पंचायत मैंदाणे, ता.साक्री जि.धुळे ...**सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसने कळविण्यात येत` की, अर्जदाराच्या मुलीचा जन्म मैंदाणे, ता.साक्री धुळे येथे दि. १६/०४/२००७ रोजी झालेला असुन तिचे नाव खुशी संजय पटाडा असे आहे. या विषयी हा अर्ज अर्जदाराने सादर केलेला आहे या अर्जात पुढील सुनावणीची तारीख २४/८/२०२३ रोजी नेमली आहे. तरी कुणास या अर्जाबाबत हरकत असेल तर सकाळी १०.३० वाजता हजर राहून आक्षेप नोंदवावा या करीता हि जाहीर नोटीस असे.

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**फौजदारी न्यायालय कोर्ट, साक्री** **फौजदारी न्यायालय कोर्ट, साक्री**

# समान नागरी कायद्याबाबत उद्धव ठाकरेंची भूमिका संदीग्ध

**विधान परिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे यांची टीका**

**नाशिक । प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे जरी राज्यातून नेतृत्व करीत असले, तरी मात्र लाल किल्ल्यावर काय बोलले पाहिजे, काश्मीर-श्रीनगरच्या चौकात तिरंगा फडकला पाहिजे आदी देशपातळीवरचे विचार ते मांडायचे. तर जेव्हा समान नागरी कायद्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याची वेळ आली, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी ड्राफ्ट आल्यावर त्यावर भूमिका घेऊ असे उत्तर दिले होते. अशी टीका वजा प्रतिक्रिया विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काल केली.

समान नागरी कायद्यासंदर्भात बोलताना त्या पुढे म्हणाल्या की, खरंतर उद्धव ठाकरे हे ते मुख्यमंत्री होते. त्यांना ड्राफ्टच्या प्रतीक्षेची गरजच नव्हती. मी उद्धव ठाकरे यांना फोनवर समान नागरी कायद्यात काय असावे? याबाबतचे काही मुद्दे शिवसेनेने द्यायला हवे, असे सुचवले होते. मात्र तसे झाले नाही. अशी खंत विधान परिषदेच्या उपसभापती तथा शिवसेनेच्या (शिंदे गट) नेत्या नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली. नाशिक येथील शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयामध्ये आयोजित



पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी समान नागरी कायदा, राम मंदिर या राष्ट्रीय भूमिकेशी एकनाथ शिंदे यांनी समरस भूमिका घेतल्याने, शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याचेही गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. यावेळी ना. डॉ. गोऱ्हे यांचा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. याप्रसंगी शिवसेनेचे संपर्कप्रमुख भाऊसाहेब चौधरी, सहसंपर्कप्रमुख राजू लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, ग्रामीण जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे, अनिल ढिकले, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, माजी आमदार मेंगाळ, माजी आमदार पांडुरंग गांगड, ग्रामीण जिल्हा संघटक मंगला भास्कर, उपजिल्हाप्रमुख सुदाम डेमसे, श्याम साबळे, दिगंबर मोगरे, दिगंबर नाडे, रोशन शिंदे, शरदचंद्र नामपुरकर आदी उपस्थित होते.




# पोपटराव हिरे यांना भाजपातर्फे अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपाचे ज्येष्ठ नेते, ग्रामोदय शिक्षण संस्थेचे संस्थापक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील एक आदरणीय नेतृत्व तसेच ग्रामीण व आदिवासी भागात शिक्षणाची गंगा घेऊन जाणारे पोपटराव हिरे यांच्या १४ व्या स्मृतिदनानिमित्त भाजपा कार्यालय 'वसंतस्मृती' येथे शहराध्यक्ष गिरीष पालवे यांच्या हस्ते पोपटराव हिरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी संघटन सरचिटणीस प्रशांत जाधव, ग्रामीण संघटन सरचिटणीस सुनील बच्छाव, गणेश गीते, नंदकुमार देसाई, रामहरी संभेराव, अरुण शेंदुर्णीकर, हिरामण शिंदे, भगवान काकड, राजेंद्र मोरे, वसंत उशीर, राकेश पाटील, विजय कुलकर्णी, देवेंद्र चुंभळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**अ‍ॅड.अजय एस. सानप, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज. क्र.७८३/२०२३**

शामराव नामदेव अमृतसागर
उ.वय.:- ७१ वर्ष, धंदा :- शेती,
रा. राजवाडा, खेडे, ता.जि.धुळे. .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ... **सामेनवाला**
**आणि**
१. नामदेव नारायण अमृतसागर (मयत)
मृत्यु दि. १०/११/१९८८
२. सरूबाई नामदेव अमृतसागर (मयत)
मृत्यु दि. २१/०२/२०१५
दोघांचा मृत्यु समयी पत्ता : खेडे, ता. जि. धुळे ...**मयत**

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. २८/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ७८३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदारहे नामदेव नारायण अमृतसागर (मयत) यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय व रेशनकार्डावरील इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने सदरहु वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १०/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ७, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण धुळे
दिनांक :-१४/७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

# निफाड तालुक्यातील १६ तलाठी कार्यालय व निवासस्थानासाठी ४ कोटी ८० लक्षचा निधी

**लासलगाव । वार्ताहर**

राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून येवला मतदासंघांत निफाड तालुक्यातील १६ गावांमध्ये नवीन तलाठी कार्यालय व निवासस्थानासाठी ४ कोटी ८० लक्ष रुपयांच्या निधीस शासनाची मंजुरी मिळाली आहे.या विकास कामांमुळे सुसज्ज कार्यालय उभे राहणार असून नागरिकांना महसुली सुविधा उपलब्ध होण्यास अधिक मदत होणार आहे.

येवला मतदासंघांत निफाड तालुक्यातील १६ गावांमध्ये नवीन तलाठी कार्यालय व निवासस्थाने बांधण्यासाठी राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांचा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता.

या विकास कामांमुळे सुसज्ज कार्यालय उभे राहणार असून नागरिकांना महसुली सुविधा उपलब्ध होण्यास अधिक मदत होणार आहे.

**अ‍ॅड.संदीप अर्जुन गर्दे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि. अर्ज क्र. ७९५/२०२३**

१) शालिनी रमेश मालपुरे .....**अर्जदार**
**विरुध्द**
**निरंक** ...**जाबदेणार**
१) कै. रमेश जगन्नाथ मालपुरे
(मृत्यु दि. २२/०३/२०२१ रोजी मयत) ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. सो. धुळे यांचेकडे दि १/७/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि . दि . अर्ज क्र. ७९५/२०२३ चा अर्ज कै. रमेश जगन्नाथ मालपुरे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२१/०८/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोर्ट नं. १ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. १३/७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे**

**अ‍ॅड. संतोष केदार**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. सो. वर्ग १ धुळे यांचे कोर्टात**

**फौ. कि. अर्ज नं. ५२०/ २०२३**

संजय उमराव बेलदार उ.व. : ४३ वर्ष, कामधंदा:-मजुरी
रा.:-तिखी, ता.जि.धुळे. .....**अर्जदार**
**विरुध्द**
म.ग्रामसेवक सो.,
ग्रामपंचायत कार्यालय, तिखी, ता.जि.धुळे ...**सामनेवाला**
(संजय उमराव बेलदार यांचा जन्म दि. ०१/०१/१९७९)

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि. २६/०६/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं.५२०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे संजय उमराव बेलदार याच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. २३/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-१४/०७/२०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

**अ‍ॅड. शशिकांत आर. पाटील, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**फौ. कि. अर्ज नं. ५१८/२०२३**

समाधान तुकाराम पाटील उ.व.:-३८ वर्ष, कामधंदा:-मजुरी,
रा.:- बुरझड ता. जि धुळे.
ह.मु बालाजी नगर औरगाबाद ता.जि.औरंगाबाद .....**अर्जदार**
**विरुध्द**
ग्रामसेवक सो. ग्रामपंचायत बुरझड ता.जि.धुळे. ...**सामनेवाला**
अर्जदाराचे वडील नामे तुकाराम लक्ष्मण पाटील याच्या मुत्यू दि. (९/५/२०१२)

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग-१ सो. कोर्ट नं. ०८ यांचे न्यायालयात फौ. कि. अर्ज. नं. ५१८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) अन्वये तुकाराम लक्ष्मण पाटील याच्या मुत्यू दि. (९/५/२०१२) रोजीच्या मुत्यूची नोंद होणे बाबत सामनेवाला याना आदेश होणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्जदार याने सदरच्या अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २३/८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदंडाधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे शिक्यानिशी, सही व शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**मे.मुख्य न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट, धुळे** **मे.मुख्य न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट, धुळे**

**अ‍ॅड. विशाल बी. पाटील**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं ६३५/२०२३**

१. सुनंदा संजय पवार (पाटील) उ.वय-५४ वर्षे, धंदा:- घरकाम
२. प्रशांत संजय पाटील (पवार) उ.वय-२८ वर्षे, धंदा :- नोकरी
रा. राम मंदिर चौक, मोराणे प्र. लळींग, ता. जि. धुळे
३. मनिषा पंढरीनाथ पाटील उ.वय -४३ वर्षे, धंदा:-मजुरी
रा. आनोरे, पो.धानोरे ता.धरणगांव जि. जळगांव
४. मुलकनबाई उखा पवार(पाटील) उ.वय-५४ वर्षे,धंदा:-घरकाम
रा.जखाने, ता.शिंदखेडा जि.धुळे .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
संजय उखा पवार (पाटील)
मृत्यु दिनांक २१/०३/२०२३ ...**मयत**

ज्या अर्थी अर्जदार क्र. १ ते ४ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर धुळे यांच्या न्यायालयात दि. ०८-०६-२३ रोजी दि.कि.अर्ज नं. ६३५ चा वारस दाखला (Legal Heir Certificate) मौजे मोराणे ता.जि.धुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे कायदेशीर वारस ठरवुन मिळण्याकरीता सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालवण्याकरीता पुढील चौकशी दि. २१/०८/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की,

याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. ७ वे सह दिवाणी न्यायाधिश सौ. कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दि. २१/०८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजेचा सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकीलामार्फत हरज राहुन आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे.
दिनांक : १४/७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**सह न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे** **सह न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे**

**प्रोसेज जमा** **अ‍ॅड. एम. सी. बेडसे.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. २३४/२०२३**

१) श्री. रतन वारु माळी, वगैरे- .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. १३/८ / २०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ७ यांचे वडिल नामे कै. वारु रामजी माळी ह्यांचे दि. १२/१२/१९९२ रोजी मौजे खुडाणे ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते/संबंध |
|---|---|
| (१) श्री. रतन चारु माळी- | मुलगा |
| २) श्रीमती बायजाबाई नामदेव अहिरे - | मुलगी |
| ३) श्रीमती शांताबाई रामदास माळी - | मुलगी |
| ४) श्री. राजाराम वारु माळी - | मुलगा |
| ५) श्री. तुळशिराम वारु माळी - | मुलगा |
| ६) श्रीमती शांताबाई दगडू माळी - | मुलगी |
| ७) श्री. शिवाजी वारु माळी - | मुलगा |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. ३०/८/२०२३ रोजी स्वतः अगर चकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल...

सदर जाहिर नोटीस मे.न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय साक्री** **दिवाणी न्यायालय, साक्री**

**प्रोसेज जमा** **अ‍ॅड. एम. सी. बेडसे.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. २०८/२०२३**

१) श्री. श्रीराम पुंडलिक भामरे, वगैरे- .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. १०/७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते. की, अर्जदार नं. १ ते ६ यांची आई नामे कै. हासरबाई रंगमल शिंदे ह्यांचे दि. १०/०९/१९९० रोजी मौजे हट्टी खुर्द ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते संबध |
|---|---|
| १) श्री. श्रीराम पुंडलिक भामरे- | भाऊ |
| २) सौ. अक्काबाई अनिल पाटोळे- | बहिण |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे- न्यायालयात दि. २८/८/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय साक्री** **दिवाणी न्यायालय, साक्री**

**प्रोसेज जमा** **अ‍ॅड. एम. सी. बेडसे.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. १९२/२०२३**

१) श्री. केडू रंगमल शिंदे, वगैरे- .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. ३/७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की,

अर्जदार नं. १ ते ६ यांची आई नामे कै. हासरबाई रंगमल शिंदे ह्यांचे दि. १०/०९/१९९० रोजी मौजे हट्टी खुर्द ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते/संबंध |
|---|---|
| १) श्री. वेडू रंगमल शिंदे - | मुलगा |
| २) श्री. राजधर रंगमल शिंदे - | मुलगा |
| ३) श्री. शिवाजी रंगमल शिंदे - | मुलगा |
| ४) सौ. सिंधुबाई बापु वाघ - | मुलगी |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. १८/८/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय साक्री** **दिवाणी न्यायालय साक्री**

## न्यूज कॉलम

### अधिक मासानिमित्त दत्त महात्म्य कथा सप्ताह

**नाशिक ।** अधिक महिन्यानिमित्ताने डिजीपीनगर क्रमांक १ मधील विघ्नहरण गणेश मंदिरात १८ जुलैपासून रोज सायंकाळी साडे पाच वाजता श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्बे स्वामी महाराज विरचित श्री दत्त महात्म्य कथा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. संत साहित्याचे निरूपणकार पद्माकर देशपांडे हे दत्त महात्म्य उलगडून सांगणार आहेत. तरी शहरातील भाविक भक्तांनी जरूर श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री विघ्नहरण देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

### उप्परपिंड गावात आमंत्रण देण्यावरून वाद

**शिरपूर ।** शिरपूर तालुक्यातील उप्परपिंड येथे हंबरसिंग सरदारसिंग राजपूत (वय ५५) यांना गावातील लक्ष्मण चिंतामण सैंदाणे, दादू लक्ष्मण सैंदाणे यांनी काठ्यांनी मारहाण केली. गावातील लोक मला आमंत्रण देतात; परंतु तू आमच्या घरी येऊन आमंत्रण का सांगत नाही, अशी विचारणा राजपूत यांनी केल्यामुळे ही मारहाण करण्यात आली. शिरपूर पोलिस ठाण्यात याविषयी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळे शहरातील पांझरा नदीच्या स्वच्छतेसाठी सरसावले हजारो हात

**धुळे । प्रतिनिधी**



महापालिकेमार्फत नदी पात्रात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी महापालिकेसह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना तसेच शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी अशा सुमारे ४ ते ५ हजार जणांनी नदीपात्र स्वच्छ केले. स्वच्छता मोहिमेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व घोषणांमुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण होते. यावेळी नदीपात्रातील मोठी झुडूपे, जलपर्णी वनस्पती काढण्यात येऊन प्रवाहाचा मार्ग मोकळा करण्यात आला.

याप्रसंगी महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, एलसीबी पीआय हेमंत पाटील, पीआय नितीन देशमुख, आयुक्त देविदास टेकाळे, अति.आयुक्त विजय सनेर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, उपमहापौर वैशाली वराडे, बेटी बचाओ अभियानच्या प्रमुख अल्पा अग्रवाल, महिला बालकल्याण सभापती सारिका अग्रवाल, उपसभापती सौ.विमल पाटील, नगरसेविका मायादेवी परदेशी, कल्याणी अंपळकर, नगरसेवक हर्षकुमार रेलन, राजेश पवार, पुष्पा बोरसे, स्नेहल जाधव, रंगनाथ ठाकरे, साबीर शेख, आरती पवार, महंत साळस्कर बाबा, सुधाकर बेंद्रे, ओमप्रकाश खंडेलवाल, महेंद्र विसपूते, बबन चौधरी, महादेव परदेशी, शिवाजीराव चौधरी, यशवंत येवलेकर, मोहिनी गौड, प्रभादेवी परदेशी, मिनाक्षी सोनार, मोनिका शिंपी, मंडळ अध्यक्ष सुबोध पाटील, मुक्ताई महिला मंडळाच्या सुमन सोनार, सौ.भाग्यश्री, सौ.उमाताई कोळवले आदी मान्यवर उपस्थित होते.

शहरातील विविध भागातून महाविद्यालय व शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थी स्वच्छतेच्या घोषणा देत कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित झाले. यावेळी सिध्देश्वर गणपती मंदिरापासून ते लहान पुलापर्यंतच्या नदीपात्रातील कचरा संकलित करण्यात आला. महापौर, आयुक्त, पोलीस अधीक्षक व उपस्थित सर्व लोकप्रतिनिधींनी स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदविल्याने उपस्थितांचा उत्साह द्विगुणीत झाला होता. यात प्रामुख्याने पोलीस प्रशिक्षण केंद्र तसेच विविध पोलीस विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी, ४८ एनसीसी बटालियन यांची उपस्थिती लक्षणीय होती. या उपक्रमात श्रीमती सीताबाई शंकर माळी हायस्कूल, इंदिरा महिला स्कूल, नैसर्गिक मानवाधिकार फोरम, अग्रसेन महाराज विद्यालय, गर्ल्स उर्दू शाळा, लायन्स क्लब, इंदिरा महिला मंडळ, प्रभादेवी परदेशी, कै. कमलाबाई अजमेरा हायस्कूल, महानुभव आश्रम देवपूर, एल.एम. सरदार हायस्कूल, गुड मॉर्निंग ग्रुप, धुळे कन्सल्टींग इंजि. असोसिएशन, आर्चिव असोसिएशन, चेअरमन विजय पोलीस कॉलनी, जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, जे.आर. सिटी हायस्कूल, डॉ.आंबेडकर हायस्कूल, राष्ट्र सेवा दल, अ.भा. मराठी महासंघ, पितांबर नगर नकाणेरोड नागरिक, गायत्री परिवार, जयहिंद ज्युनिअर कॉलेज, गिंदोडीया हायस्कूल, ताराबाई सोमाणी अध्यापिका, जयहिंद हायस्कूल, इनरव्हील क्लब, डी. डी.विसपूते ज्युनिअर कॉलेज, विद्यावर्धिनी महाविद्यालय, क्रेडाई संघटना, रोटरी क्लब तसेच विविध महाविद्यालय व संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अति. आयुक्त विजय सनेर यांनी केले. यावेळी आयुक्त देविदास टेकाळे यांनी, शहराच्या विधायक कामात नागरिकांनी योगदान देऊन शहराला नवी ओळख देण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन केले. समारोपप्रसंगी महापौर प्रतिभाताई चौधरी यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली. आभार प्रदर्शन उपायुक्त डॉ.संगिता नांदुरकर यांनी मानले. सूत्रसंचालन वाहिद अली अन्सारी यांनी केले. राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनपाचे सर्व विभागप्रमुख, अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज नाशकात होणार जल्लोषात स्वागत

## नाशिकरोड ते विश्रामगृहापर्यंत बाईक रॅली काढत उपमुख्यमंत्री पवार यांचे होणार जंगी स्वागत– शहराध्यक्ष रंजन ठाकरे

**नाशिक । प्रतिनिधी**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे राज्य मंत्रिमंडळात शपथ घेतल्यानंतर शासन आपल्यादारी उपक्रमाच्या निमित्ताने पहिल्यांदाच नाशिक दौऱ्यावर येत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली असून पक्षाच्या वतीने त्यांचे नाशिक शहरात जल्लोषात स्वागत करण्यात येणार आहे. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आज शनिवार दि.१५ रोजी सकाळी वंदेभारत एक्सप्रेसने नाशिकरोड रेल्वे स्थानकात दाखल होणार आहे. यावेळी नाशिक शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात येणार आहे. सकाळी ९ वाजता उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचं आगमन झाल्यानंतर नाशिकरोड ते शासकीय विश्रामगृह नशिकपर्यंत बाईक रैली काढण्यात येणार आहे. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शहराध्यक्ष रंजन ठाकरे, पदाधिकारी नानासाहेब महाले, दिलीप खैरे, निवृत्ती अरींगळे, मधुकर मौले, महिला अध्यक्ष योगिता आहेर, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, विद्यार्थी अध्यक्ष गौरव गोवर्धने, युवती अध्यक्ष ऐश्वर्या गायकवाड, विभागीय अध्यक्ष मनोहर कोरडे, शेख सलिमराज, बाळासाहेब गीते, नाना सोमवंशी, शंकर मोकळ, मुजाहित शेख, वसीम शेख, जीवन रायते, सरचिटणीस संजय खैरनार यांनी केले आहे.

# आज कालिदास कलामंदिरात रंगणार मल्हार महोत्सव

## गायन, वादन, नर्तनाने नाशिककर रसिकांची संध्याकाळ होणार संस्मरणीय

**नाशिक । प्रतिनिधी**

नूपुर नाद, पुणे आणि मुसोमिंट यांच्या संयुक्त विद्यमाने आज शनिवार दि.१५ रोजी सायं ५ वाजता कालिदास रंगमंदिरात मल्हार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात गायन, वादन, नर्तन यांचा समन्वय साधत पावसाच्या आगळ्या रचना सादर होणार आहेत. महोत्सवात रेखा नाडगौडा यांच्या कीर्ती कला मंदिर येथील नर्तिका कथक समूह रचना सादर करतील करणार असून प्रथितयश भरतनाट्यम नृत्य कलाकार डॉ. स्वाती दैठणकर आणि नूपुर दैठणकर बाग पावस ऋतु हा नृत्याचा कार्यक्रम करणार आहेत. त्यांना नीति नायर, पंचम उपाध्याय आणि संजय शाशिधरण हे साथसंगत करणार आहेत.

साऊंड्स ऑफ मल्हार अशा प्रकारे गायन वादन नृत्याच्या अनोख्या सादरीकरणाने १५ जुलैची संध्याकाळ रसिकांसाठी संस्मरणीय होणार आहे. नाशिककर रसिकांनी या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# ना.छगन भुजबळ यांचे नाशिक विमानतळावर जल्लोषात स्वागत

**नाशिक । प्रतिनिधी**



राज्याच्या मंत्री मंडळात शपथ घेतल्यानंतर ना.छगन भुजबळ हे काल येवला दौऱ्यावर होते. काल नाशिक विमानतळावर पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तसेच जानोरी येथील स्थानिक नागरिकांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

याप्रसंगी माजी खासदार समीर भुजबळ, आ. दिलीप बनकर, आ. हिरामण खोसकर, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, विष्णुपंत म्हैसधूने, गोरख बोडके, उषाताई बच्छाव, राजेंद्र शिंदे, डॉ योगेश गोसावी, संजय खैरनार, सुरेश खोडे, गणेश तिडके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व जानोरी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ नाशिक, रिव्हरसाइडचा पदग्रहण सोहळा

**नाशिक । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ नाशिक, रिव्हरसाइडचा पदग्रहण सोहळा आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्या उपस्थितीत पदग्रहण सोहळा संपन्न झाला. यावेळी माजी अध्यक्ष यतीन पटवर्धन, निलेश गर्गे यांच्याकडून नूतन अध्यक्षा रत्ना कुलकर्णी, सहसेक्रेटरी स्नेहा कुलकर्णी, खजिनदार आरती कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी सांगितले की, आदिवासी भागातील महिलांनी बनवलेल्या वस्तुंना चांगली बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी मी सहकार्य करेल असे आश्वासन त्यांनी देत नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. अतिदुर्गम भागात काम करणार आहे असे नूतन अध्यक्षा रत्ना कुलकर्णी यांनी जाहीर केले. सूत्रसंचलन मंजुषा भावे यांनी केले. आभार स्नेहा कुलकर्णी यांनी मानले.

# कायमस्वरूपी तलाठी मिळण्यासाठी टोकडे ग्रामस्थांचे प्रांताधिकाऱ्यांना साकडे



**मालेगाव । प्रतिनिधी**

मालेगाव तालुक्यातील टोकडे हे महसूल सजा गाव असुन येथील तलाठी पद रिक्त असून कायमस्वरूपी तलाठी नेमण्याची टोकडेच्या ग्रामस्थांची अनेक वर्षांपासून मागणी आहे. मालेगाव तालुक्यातील टोकडे हे गाव सजा झालेपासुन तलाठी उपलब्ध नसून याचा अतिरिक्त कार्यभार दुसऱ्या एका गावाच्या सजेचे तलाठी सुधीर कदम यांचेकडे देण्यात आलेला आहे. तलाठी येथे उपस्थित राहत नसल्यामुळे ग्रामस्थांची प्रचंड गैरसोय होत असून तात्काळ कायमस्वरूपी तलाठी नेमणूक करण्यात यावी अशी मागणी मालेगावच्या प्रांताधिका-यांकडे स्मरणपत्र निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मागणीची त्वरीत अंमलबजावणी होत नसल्याने अतिरिक्त कार्यभार असलेले सुधीर कदम यांना या गावातील ग्रामस्थांना वेळ देणे शक्य होत नाही. परिणामी येथे गेल्या अनेक वर्षांपासून तलाठी उपलब्ध नाही. कामकाजासाठी ग्रामस्थांना अस्ताने गावी चकरा माराव्या लागतात. त्यामुळे टोकडे सजा परिसरातील नागरिक त्रस्त असून यासंदर्भात येथे कायमस्वरूपी तलाठी नियुक्त करावा. ग्रामस्थांच्या भावना विचारात घेऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी टोकडे येथील ग्रामस्थ दशरथ लिद्दड, बळीराम डिंगर, काशिनाथ डिंगर, अनिल डिंगर, गोटू धाडिवाळ, निळकंठ रंगी, हेमंत फरस, नितीन डिंगर, जवाहरसिंग संगेडा, विठोबा द्यानद्यान यांनी केली आहे.

# लोकमान्य विद्यालयात विद्यार्थ्यांना दाखवले चंद्रयाण प्रक्षेपण



**धुळे ।** भारताची महत्त्वाकांक्षी मोहीम चांद्रयान-३ लाँच करण्यात आले आहे. देशाची ही तिसरी चांद्रयान मोहीम आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा येथे असणाऱ्या सतीश धवन अंतराळ संशोधन केंद्रातून दुपारी २.३५ मिनिटांनी चांद्रयाना ने अवकाशात झेप घेतली. इस्त्रोच्या अधिकृत यूट्यूब चॅनलवरून याचं थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. तसेच धुळे शहरातील लोकमान्य माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थीना चांद्रयान मोहिमेचे प्रक्षेपण दाखवण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका संगीता पाटील यांच्यासह सर्व शिक्षक आणि कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# अंनिसचे राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संघटनात्मक रचनेचा भाग म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव हे जबाबदारीचे पद स्वीकारलेल्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे संघटना बांधणीचे प्रशिक्षण नुकतेच नाशिक येथे संपन्न झाले. खुटवडनगर मधील सीटू कामगार भवनात झालेल्या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात राज्यातून पदाधिकारी सामिल झाले होते.

अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, डॉ.ठकसेन गोराणे, राज्य सरचिटणीस विनायक सावळे, विजय परब यांनी जिल्ह्यात शाखांची निर्मिती कशी करावी, नवीन कार्यकर्ते कसे मिळवावेत, घडवावेत आणि टिकवावेत, त्यासाठी त्यांना प्रशिक्षण कसे द्यावे, शाखा निवड प्रक्रिया कशी राबवावी, जिल्ह्याचा नेता म्हणून कसे कामकाज पहावे, शाखांच्या बैठका कशा घ्याव्यात, संघटनेची कार्यसंस्कृती, मूल्ये आणि आचारसंहिता कशी असते, संघटना तथ्य व पथ्य, संघटने पुढील आव्हाने तसेच पुढील चार महिन्यात जिल्ह्यात करावयाचे संघटनात्मक व उपक्रमात्मक काम या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्रशिक्षणार्थींच्या शंकांचे निरसन केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती केवळ समाजातील अंधश्रद्धांचे निर्मूलन करते असे नाही तर समाजातील विविध क्षेत्रात विवेकाशी विसंगत घटना घडतात, त्यावेळेस तेथे अंनिसने पुढाकार घेऊन ती आव्हाने पेलली आहेत. यापुढेही ते काम सुरूच राहील, असा आशावाद संघटनेचे राज्य उपाध्यक्ष उत्तम कांबळे यांनी व्यक्त केला. आधुनिक तंत्रज्ञानाचा संघटना विस्तारासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ शकतो. त्यासाठी कोणकोणती तंत्रे वापरता येण्यासारखी आहेत, याबद्दल नाशिक येथील संगणक क्षेत्रातील तज्ञ सुनील खांडबहाले यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

दोन्ही दिवसाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेच्या प्रशिक्षण विभागाचे राज्यकार्यवाह सुरेश बोरसे यांनी केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी नाशिक येथील अंनिसचे कार्यकर्ते कृष्णा चांदगुडे, प्रा. डॉ. सुदेश घोडेराव, राजेंद्र फेगडे, प्रल्हाद मिस्त्री, डॉ. श्यामसुंदर झळके, नितीन बागुल, महेंद्र दातरंगे, ड. समीर शिंदे, अरुण घोडेराव, दीपक वर्दे, प्रथमेश वर्दे, विशाल गोराणे, सीटूचे सिताराम ठोंबरे तुकाराम सोनजे, मोहन जाधव, केदार यांनी परिश्रम घेतले. खुटवडनगर मधील सीटू कामगार भवनात झालेल्या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात राज्यातून पदाधिकारी सामिल झाले होते. प्रशिक्षणार्थींच्या शंकांचे निरसन केले. दोन्ही दिवसाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेच्या प्रशिक्षण विभागाचे राज्यकार्यवाह सुरेश बोरसे यांनी केले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited ‘B’ Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र



शनिवार, दि. १५ जुलै २०२३



# धुळे मनपातर्फे पांझरा नदीत स्वच्छता मोहीम




















धुळे।
शहरातील विविध भागातून महाविद्यालय व शाळांमधील विद्यार्थी स्वच्छतेच्या घोषणा देत कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित झाले. यावेळी सिध्देश्वर गणपती मंदिरापासून ते लहान पुलापर्यंतच्या नदीपात्रातील कचरा संकलित करण्यात आला. महापौर, आयुक्त, पोलीस अधीक्षक व उपस्थित सर्व लोकप्रतिनिधींनी स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदविल्याने उपस्थितांचा उत्साह द्विगुणीत झाला होता. यात प्रामुख्याने पोलीस प्रशिक्षण केंद्र तसेच विविध पोलीस विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी, ४८ एनसीसी बटालियन यांची उपस्थिती लक्षणीय होती. या उपक्रमात श्रीमती सीताबाई शंकर माळी हायस्कूल, इंदिरा महिला स्कूल, नैसर्गिक मानवाधिकार फोरम, अग्रसेन महाराज विद्यालय, गर्ल्स उर्दू शाळा, लायन्स क्लब, इंदिरा महिला मंडळ, प्रभादेवी परदेशी, कै.कमलाबाई अजमेरा हायस्कूल, महानुभव आश्रम देवपूर, एल.एम. सरदार हायस्कूल, गुड मॉर्निंग ग्रुप, धुळे कन्सल्टींग इंजि. असोसिएशन, आर्चिव असोसिएशन, चेअरमन विजय पोलीस कॉलनी, जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, जे.आर. सिटी हायस्कूल, डॉ.आंबेडकर हायस्कूल, राष्ट्र सेवा दल, अ.भा. मराठी महासंघ, पितांबर नगर नकाणेरोड नागरिक, गायत्री परिवार, जयहिंद ज्युनिअर कॉलेज, गिंदोडीया हायस्कूल, ताराबाई सोमाणी अध्यापिका, जयहिंद हायस्कूल, इनरव्हील क्लब, डी. डी.विसपूते ज्युनिअर कॉलेज, विद्यावर्धिनी महाविद्यालय, क्रेडाई संघटना, रोटरी क्लब तसेच विविध महाविद्यालय व संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
शनिवार, दि. १५ जुलै २०२३
६



# धुळ्यात पांझरा नदीपात्रात स्वच्छता मोहीम














नाशिक । जिल्ह्यातील महापालिकेमार्फत नदी पात्रात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी महापालिकेसह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना तसेच शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी अशा सुमारे ४ ते ५ हजार जणांनी नदीपात्र स्वच्छ केले. स्वच्छता मोहिमेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व घोषणांमुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण होते. यावेळी नदीपात्रातील मोठी झुडूपे, जलपर्णी वनस्पती काढण्यात येऊन प्रवाहाचा मार्ग मोकळा करण्यात आला. याप्रसंगी महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, एलसीबी पीआय हेमंत पाटील, पीआय नितीन देशमुख, आयुक्त देविदास टेकाळे, अति.आयुक्त विजय सनेर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, उपमहापौर वैशाली वराडे, बेटी बचाओ अभियानच्या प्रमुख अल्पा अग्रवाल, महिला बालकल्याण सभापती सारिका अग्रवाल, उपसभापती सौ.विमल पाटील, नगरसेविका मायादेवी परदेशी, कल्याणी अंपळकर, नगरसेवक हर्षकुमार रेलन, राजेश पवार, पुष्पा बोरसे, स्नेहल जाधव, रंगनाथ ठाकरे, साबीर शेख, आरती पवार, महंत साळस्कर बाबा, सुधाकर बेंद्रे, ओमप्रकाश खंडेलवाल, महेंद्र विसपूते, बबन चौधरी, महादेव परदेशी, शिवाजीराव चौधरी, यशवंत येवलेकर, मोहिनी गौड, प्रभादेवी परदेशी, मिनाक्षी सोनार, मोनिका शिंपी, मंडळ अध्यक्ष सुबोध पाटील, सुमन सोनार, भाग्यश्री, सौ.उमाताई कोळवले आदी मान्यवर उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ